# प्रकरण तिसरे

# उपचारात्मक आणि समृद्धी उपक्रमांद्वारे भाषिक क्षमतांचा विकास

# प्रकरण - तिसरे

# उपचारात्मक आणि समृद्धी उपक्रमांद्वारे भाषिक क्षमतांचा विकास

## ३.१ प्रस्तावना :

आजचे युग हे गतिमान आहे. या गतिमान युगात विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळी उंचविण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात अनेक परिवर्तने घडू लागली आहेत. वर्गातील दळणवळणाची प्रक्रिया प्रभावी व्हावी म्हणून शिक्षक आपल्या अध्यापन प्रक्रियेत विविध मार्गांचा व माध्यमांचा उपयोग करतो. यात अध्यापन साहित्याची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. अध्यापन साधनांचा वापर केल्याने अध्यापनाचे कार्य सुकर होते. अध्यापन साहित्यामुळे अध्ययनाकडे अवधान खेचले जाते. त्यामुळे ज्ञान प्रसारण सुलभ होते.

विद्यार्थ्यांना अध्ययन करीत असताना अनेक अडथळे येत असतात. ते दूर होण्यासाठी शैक्षणिक साधने वापरुन उपचारात्मक उपक्रम निवडावे लागतात. त्याद्वारे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुलभ होऊ शकतो. अपेक्षित क्षमतांच्या प्राप्तीसाठी विविध प्रकारचे उपचारात्मक उपक्रम राबविणे गरजेचे असते. अध्यापनात आपणास जी त्रुटी सापडते, ती उपक्रमांद्वारे नाहीशी करता येते.

विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेत गती येण्यासाठी घटकानुरुप उपचारात्मक उपक्रम राबविता येतात. त्याचप्रमाणे हुशार विद्यार्थ्यांनाही समृद्धी उपक्रम राबविता येत असतात. उपचारात्मक व समृद्धी उपक्रम राबविताना काही शैक्षणिक साधनांचा वापर करावा लागतो. शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करावा लागतो.

### शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर :

शैक्षणिक तंत्रज्ञान ही संकल्पना शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांच्या परिचयाची आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ यामध्ये शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या प्रसाराला वैशिष्ट्यपूर्ण स्थान दिले आहे. शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या योग्य वापरामुळे शिक्षणातल्या समस्या सोडविण्यासाठी पर्यायी योजना यंत्रणा विकसित करता येईल. अध्ययन प्रक्रियेला गती मिळण्यासाठी उपक्रमामध्ये शैक्षणिक साहित्य निर्मिती करताना, टीव्ही, संगणक, ओव्हरहेड प्रोजेक्टर अशा पद्धतींचा वापर करता येईल.

## ३.२ उपचारात्मक उपक्रम :

### ३.२.१ उपचारात्मक उपक्रम : ऐतिहासिक पार्श्वभूमी :

मूल्यमापनाद्वारे क्षमता संपादनात आढळून आलेले अध्ययनातील अडथळे, उणीवा व दोष दूर करुन विद्यार्थ्यांची संपादणूक प्रभुत्व पातळीपर्यंत पोहोचावी यासाठी केलेली योजनाबद्ध कार्यवाही म्हणजे उपचारात्मक कार्यक्रम (Remedial Programme) होय. उपचारात्मक कार्यक्रमांमध्ये पुनरध्यापन, अध्यापनात सुधारणा, सरावांचे स्वाध्याय व पर्यवेक्षित अभ्यास इत्यादींचा समावेश होतो. हा कार्यक्रम विशेषत: ५०% पेक्षा कमी संपादणूक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असतो. अध्यापन-अध्ययन प्रक्रियेमध्ये दिलेले उद्दिष्ट साध्य होत नाही. उदा. वेळेत प्रभुत्व पातळी गाठेपर्यंत उपचारात्मक उपक्रमांची राबवणूक करुन विद्यार्थ्यांना किमान पातळीपर्यंत आणण्यासाठी त्याच्यावर प्रक्रिया करावी लागते. अध्यापन प्रभावी होण्यासाठी व अध्ययनात गती येण्यासाठी उपक्रम आयोजित करावे लागतात.

उपचारात्मक उपक्रमांची राबवणूक करीत असताना त्यामध्ये काही प्रमाणात शैक्षणिक साहित्याचा वापर काटेकोरपणे करणे गरजेचे असते. यासाठी उपक्रमांची निवड करताना वेळ, जागा, शैक्षणिक साहित्य यांचे नियोजन करुन उपक्रम राबवावे लागतात. भाषा विषयाच्या क्षमता विकसित होण्यासाठी क्षेमतेनुरुप उपचारात्मक उपक्रमांची योजना तयार करावी लागते. हे उपक्रम राबविताना दृक-श्राव्य साधने वापरणे अतिशय गरजेचे असते. उपक्रमांची निवड करताना विद्यार्थ्यांना आकर्षित करुन घेतील असे उपक्रम दृक-श्राव्य स्वरुपाचे असणे गरजेचे असते.

सॉक्रेटिसचा शिष्य प्लेटो या तत्वज्ञानेदेखील या दृष्टीने विचार केलेला होता असे दिसून येते. शब्दाने ज्या संकल्पनेचे किंवा वस्तूंचे वर्णन करता येत नाही त्याचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी इतर ज्ञानेंद्रियांचा वावपर कसा करता येईल याचा विचार प्लोटोने केला होता. परंतु खऱ्या अर्थाने या दृष्टीने विचार सुरु केला तो पंधराव्या शतकाच्या उत्तराधृात. कोमोनिअसचे विचार किती प्रगत होते हे त्याच्या पुढील विधानावरुन लक्षात येते. त्याने सांगितले की, 'ज्याने गेंडा प्रत्यक्ष पाहिला आहे तोच गेंडा जास्त काळ लक्षात ठेवू शकेल. परंतु तोंडी माहिती आपण अनेकवेळ सांगितली तरीसुद्धा ती लक्षात राहणे कठीण आहे.'

### ३.२.२ उपचारात्मक उपक्रम व समृद्धी उपक्रमांचे महत्व :


शिक्षणाचा प्रधान हेतू इष्ट दिशेने वर्तन-परिवर्तन बदल घडवून आणणे असा आहे. पारंपारिक पद्धतीनुसार केवळ शाब्दिक अनुभवांद्वारा ज्ञानदानाचे बहुतांशी कार्य चालत असते. आजच्या गतिमान युगामध्ये शिक्षण क्षेत्रातही प्रचंड क्रांती घडत आहे. ज्ञानाच्या कक्षा प्रतिदिनी रुंदावत आहेत. अशावेळी ज्ञानदानाचे कार्य गतिमान, अर्थबोधक, प्रभाव व मनोरंजक करण्यासाठी निवडक उपचारात्मक व समृद्धी उपक्रम यांचा योजनापूर्वक वापर करणे आवश्यक आहे.

अध्यापनात प्रत्यक्ष अनुभव देणे शक्य नसते. त्यावेळी उपक्रमांतून अनुभव देणे अत्यंत उपयुक्त ठरतात. अध्यापन करीत असताना प्रत्येक वेळी प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी छोट्या-छोट्या गोष्टींसाठी बाहेर जाणे शक्य नसते. अशावेळी शाब्दिक वर्णनाबरोबरच जर फळा, नकाशे, चित्रे, वस्तू, नमुने, आकृती, प्रतिकृती यांचा वापर करुन अध्यान केले तर विद्यार्थ्यांना योग्य आकलन होते.

विद्यार्थ्यांमध्ये विहित क्षमता विकसित करण्यासाठी विविध अध्ययन-अनुभव द्यावे लागतात. असे अध्ययन अनुभव देण्यासाठी उपचारात्मक उपक्रमांचा वापर करावा लागतो. 'पाठ्यपुस्तक' हे महत्वपूर्ण साधन आहे. सर्वच शिक्षक त्याचा जाणीवपूर्वक उपयोग करुन घेतात. मात्र अध्ययन-अध्यापनात पूर्णत्व येण्यासाठी इतर शैक्षणिक साधनेसुद्धा आवश्यक असतात.

उपचारात्मक उपक्रमांची व समृद्धी उपक्रमांमध्ये दृक-श्राव्य साधनांचा अधिक वापर करावा. कारण ज्ञानेंद्रिये ही ज्ञानप्राप्तीची द्वारे आहेत. प्रत्यक्ष पाहिल्यामुळे, ऐकल्यामुळे, व्यर्थ केल्यामुळे, वस्तू घेतल्यामुळे, वस्तूंचे यथार्थ ज्ञान होऊन तो अनुभव दीर्घकाळ आपल्या स्मरणात राहतो. लहान मुले आपल्या ज्ञानेंद्रियांच्या मार्फत ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करतात. दृष्टी, श्रवण,. स्पर्श, रस आणि गंध यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय त्यांना वस्तूंचे नीट आकलन होत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष अनुभवांवर आधारलेल्या संकल्पना चांगल्या प्रकारे स्मरणात राहतात हे लक्षात घेऊन शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जास्त प्रत्यक्ष अनुभव देण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे दृढीकरण चांगल्या प्रकारे होते.

'डॉ. एडगर डेल' यांनी ज्ञानेंद्रियांमार्फत शिकण्याचे प्रमाण आकृतीद्वारे दिले आहे.



डोळा - ८३%

कान - ११%

नाक - ३.५%


त्वचा - १.५%

जीभ - १.०%

आकृती क्रं. १

परिणामकारक अध्यापनासाठी दृक-श्राव्य साधने अत्यंत उपयुक्त ठरतात. शिक्षण अर्थपूर्ण व भोवतालच्या समाजातील घडामोडींनी जास्त निगडीत करता येते. मुलांना प्रत्यक्ष अनुभवाचा जास्तीतजास्त जवळ नेता येते.

एडगर डेल या अमेरिकन शिक्षणतज्ञाने अनुभवाचा एक त्रिकोण तयार केला आहे. यावरुन लक्षात येते की, अनुभवांचा शिक्षणात जास्तीत जास्त उपयोग होतो. अध्यापन पद्धतीची आखणी करणाऱ्या एडगर ''खात्रीशीर अध्ययन होण्यासाठी या शिडीवर जितके खाली जाता येईल तितके जा आणि सर्वात मोठ्या अध्यापनासाठी मात्र जितके वर जाता येईल तितके जा.




आकृती - २ - एडगर डेलचा अनुभवाचा विकास

एडगर डेलच्या या त्रिकोणात पाया सहेतुक प्रत्यक्ष अनुभव हा आहे. सहेतुक अनुभवातच कृतियुक्त शिक्षण येते. परंतु प्रत्येक वेळी अशा प्रकारचे सहेतुक प्रत्यक्ष अनुभव देणे शक्य नसते. अशा वेळी या शैक्षणिक साधनांचा उपचारात्मक उपक्रमांच्या वेळी उपयोग करता येईल.

### ३.२.३ उपचारात्मक व समृद्धी उपक्रमांचे स्वरुप व वर्गीकरण :

शैक्षणिक उपक्रम राबविताना त्यांचे अनेक प्रकार आहेत. त्यामध्ये अगदी नैसर्गिक स्थितीपासून कृत्रिम स्थितीपर्यंत, यांत्रिक अशा स्वरुपाचे अनेक प्रकारचे शैक्षणिक साहित्य आहे. या सर्व उपक्रमांबद्दल माहिती मिळवायची तर ती एकदम मिळविणे अत्यंत कठीण काम आहे. एकाच प्रकारचे साहित्य एकत्र करुन त्याचे निरनिराळे विभाग पाडून त्यांचा अभ्यास करणे सोपे जाते. म्हणून या सर्व साहित्याचे वर्गीकरण करणे आवश्यक आहे.

उपचारात्मक उपक्रमांचे पुढीलप्रमाणे गट आहेत.

१) नैसर्गिक उपक्रम.

२) कृत्रिम उपक्रम.

३) यांत्रिक उपक्रम (मानव निर्मित)

वरील उपक्रम राबविताना त्यासाठी दृक-श्राव्य स्वरुपाची साधने तयार केलेली आहेत. त्यांचा घटकानुरुप वापर केला जातो.

**१) दृक साहित्य :**

'डोळा' या ज्ञानेंद्रियास ज्या साहित्याने दृक संवेदना मिळून दृक प्रतिमा तयार होतात असे साहित्य म्हणजे दृक साहित्य होय. उदा. चित्रे, तक्ते, नकाशे, एपिडोस्कोप नमुने, स्लाईड्स इत्यादी. दृक्ष शिक्षण साहित्याचे दोन भाग पडतात.

**अ) प्रक्षेपित साहित्य :**

यामध्ये प्रकाश किरणांचे प्रक्षेपण केलेले असते म्हणून यास प्रक्षेपित दृक शिक्षण साहित्य असे म्हणतात. उदा. संगणक, ओव्हरहेड प्रोजेक्टर, फिल्म प्रोजेक्टर इ.

**ब) अप्रक्षेपित साहित्य :**

या प्रकारच्या साहित्यात प्रकाश किरणांचे प्रक्षेपण होत नाही. म्हणून यास अप्रक्षेपित दृक शिक्षण साहित्य असे म्हणतात. या साहित्याच्या वापरासाठी प्रोजेक्टर, संगणक अथवा इतर कोणतेही स्वयंचलित साधन वापरावे लागते नाही.

**२) श्राव्य साधने :**

उपचारात्मक उपक्रम राबविताना जुन्या परंपरागत शैक्षणिक साहित्याचा वापर केला जातो. परंतु आजच्या गुणवत्तेच्या काळात श्राव्य साधनांचाही उपयोग होत असतो. कान या ज्ञानेंद्रियास ज्या साहित्याने श्रवण संवेदना मिळून 'श्राव्य प्रतिमा' तयार होतात असे साहित्य म्हणजे श्राव्य साहित्य होय.

**३.३ उपचारात्मक उपक्रमांत व समृद्धी उपक्रमांत प्रक्षेपित शिक्षण साहित्याचे महत्व :**

ज्या साधनांद्वारे चित्रे किंवा इतर माहिती प्रक्षेपित केली जाते त्यांना प्रक्षेपित साधने म्हणतात. यामध्ये संगणक, रेडिओ, प्रोजेक्टर, इत्यादी सर्व प्रकारचे प्रक्षेपित करणेसाठी साहित्य वापरतात. विशेष प्रकारच्या प्रक्षेपणासाठी विर्शिष्ट प्रकारचे प्रक्षेपक शिक्षण साहित्य वापरावे.

सर्वसामान्यत: सर्व प्रकारच्या प्रक्षेपित शैक्षणिक साहित्यापासून शिणिाच्या प्रक्रियेत अधिक फायदे मिळतात.

१) प्रक्षेपित चित्र विद्यार्थ्यांचे लक्ष चटकन आकर्षित करुन घेतात व टिकवून ठेवतात.

२) अभिरुची विद्यार्थ्यांना वाढीस लावते.

३) अध्ययन प्रक्रिया जास्त काळ लक्षात ठेवण्यास मदत करतात.

४) शब्दजंजाळ कमी करतात.

५) जी माहिती साधारणपणे देता येत नाही ती देण्यास मदत करतात कारण त्यात विशिष्ट प्रकारचे छायाचित्रण केलेले असते ते इतर बाबतीत शक्य होत नाही.

६) चित्रे प्रक्षेपित केली जात असताना वर्गात इतर कोणतीही कृती चालू नसते.

७) अध्यापन परिणामकारक करण्यास मदत करतात.

८) जास्त संख्या असलेल्या विद्यार्थ्यांच्या वर्गात वापरता येतात.

९) पुन्हा - पुन्हा चित्रे किंवा माहिती आपणास सांगता येते.

१०) आपणास आवश्यक असणारी माहिती सांगता येते.

### ३.३.१ शैक्षणिक उपक्रमांचे नियोजन :

आधुनिक युगात नियोजनाला खूप महत्व आहे. शिक्षकाला अध्यापन साहित्य अथवा माध्यमे आपल्या अनुदेशात वापरावयाची झाली तर त्याने त्या साहित्याद्वारा उपयोगाचे नियोजन करावे. आपणांस कोणते उपक्रम राबविण्याचे आहेत त्याप्रमाणे शैक्षणिक उपक्रमांचे नियोजन करावे.

**१) शिक्षकांची तयारी :**

उपचारात्मक व समृद्धी उपक्रम यांचा वापर करीत असताना शिक्षकाला स्वत:ला काही तयारी करणे जरुरीचे असते. जे माध्यम अनुदेशनात वापरावयाचे ठरविले आहे त्याचे कार्य व वापर याची माहिती करुन घ्यावी. ते स्वत: नीट पाहून त्याची तपासणी करावी. महत्वाच्या अध्ययन-अनुभव व अध्यापन मुद्दे यांची नोंद करावी. माध्यम जास्तीत जास्त चांगले वापरता येईल याचा विचार करावा. विद्यार्थ्यांची गरज व अभिरुची यांचा विचार करावा. माध्यमांची पूर्वतयारी न करता केलेला वापर म्हणजे वेळेचा अपव्यय हे शिक्षकांनी लक्षात ठेवावे.

**२) वातावरण निर्मिती :**

माध्यमांच्या वापरासाठी योग्य असे वातावरण निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे असते. अशी वातावरण निर्मिती केली नाही तर माध्यमांची परिणामकारकता कमी होण्याची शक्यता असते.

**३) वर्गाची तयारी :**

आपण जे शैक्षणिक साहित्य उपक्रमांसाठी वापरणार आहे त्यासाठी लागणारी पूर्वतयारी करावयास हवी. लागणारे सर्व साहित्य हाताशी ठेवावे. जुळणी व मांडणी करावी. प्रकाश, वायुवीजन, बैठक व्यवस्था याकडे लक्ष द्यावे.

### ४) विद्यार्थ्यांची तयारी :

माध्यमाचा प्रत्यक्ष वापर करण्यापुर्वी विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक तयारी व्हावी. विद्यार्थ्यांना विषयाची पार्श्वभूमी समजावून सांगावी. काय पहावयाचे व काय शिकवायचे याची चर्चा करावी. नवीन शब्द, नवीन परिभाषा याची माहिती द्यावी.

### ५) माध्यमांचा प्रत्यक्ष वापर :

सर्व तयारी पूर्ण झाल्यावर शिक्षकाने प्रास्ताविक करावे व माध्यम सादर करावे. माध्यमाचा उपयोग चालू असताना विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होणार नाही हे पहावे. महत्वाच्या मुद्यांकडे लक्ष वेधावे. प्रतिपादन जोरदारपणे करावे. वेळेकडे लक्ष द्यावे.

### ६) सारांश, उजळणी व मूल्यमापन :

माध्यम वापरुन झाल्यावर सारांश सांगावा अथवा प्रश्नोत्तराने काढून घ्यावा. गैरसमजुती दूर कराव्यात, जरुरी असल्यास मूल्यमापन चाचणी घ्यावी.

### ३.३.२ उपचारात्मक उपक्रमांत तसेच समृद्धी उपक्रमात प्रक्षेपित साधनांच्या मर्यादा व उपाय :

अध्ययन अध्यापनात प्रक्षेपित साधनांना अनन्यसाधारण महत्व असले तरी प्रक्षेपित साधनांचा वापर, किंमत यांच्या मर्यादा असतात. त्या मर्यादा खालीलप्रमाणे,

१) सर्वच शिक्षकांना स्वत:ला प्रक्षेपित साधनांचा वापर करता येत नाही. सर्वच शिक्षकांना प्रशिक्षण देणे शक्य होत नाही.

२) प्रक्षेपित साधनांच्या साहाय्याने केवळ चित्र प्रक्षेपित होते. त्यांच्या बद्दलची माहिती सांगाण्याची शिक्षकाची जबाबदारी असते.

३) चित्र नमुने, फिल्मस्, प्रक्षेपित चित्रे दाखवल्याने त्याचा अर्थ बऱ्याच वेळा स्पष्ट होत नाही. हे दाखवताना खरी गोष्ट व त्यांचा संबंध स्पष्ट केला तरच त्यातील गर्भित अर्थ समजू शकतो.

४) सर्व प्रक्षेपित साधनांच्या किंमती जास्त असतात.

५) प्रक्षेपित साधनांच्या विषयी माहितीचे शिक्षकांमध्ये अज्ञान व शिक्षक उदासीन होतात.

६) प्रक्षेपित साधनांचा प्रचार व प्रसार होणे आवश्यक.

७) प्रक्षेपित साधनांच्या निर्मितीकडे दुर्लक्ष.

८) कोणतेही एक प्रक्षेपित साधन सर्व उद्दिष्टांसाठी उत्कृष्ट माध्यम असेलच असे नाही.

९) प्रक्षेपित माध्यमांसाठी शाळेत विजेयी सोय नसणे.

१०) माध्यमांचा वापर सहज व सुलभ करता येत नाही. स्वतंत्र खोलीची आवश्यकता भासते.

**३.३.३ शैक्षणिक साधनांच्या मर्यादेवरील उपाय :**

१) काही साधने नाजूक असल्याने त्यांची देशभाल करणे अत्यंत महत्वाचे असते. त्यासाठी त्या साधनांसोबत आलेल्या माहितीपत्रकानुसार आपल्या साधनांची काळजी घ्यावी.

२) प्रक्षेपित साधनांच्या साहाय्याने चित्रे, प्रक्षेपित होत असताना त्या विषयाची माहिती ध्वनिमुद्रित करून टेपरेकॉर्डरच्या साहाय्याने लावल्यास शिक्षकास माहिती सांगण्याची गरज भासत नाही.

३) काही साधने उपलब्ध शालेय साधनातून कमी खर्चात घरी निर्माण करता येतात.

४) शैक्षणिक गटशिबीरे, सेवांतर्गत प्रशिक्षण, कृतिसत्रे यामध्ये साधी प्रक्षेपित यंत्रे तयार करून घ्यावीत.

५) शैक्षणिक साहित्य तयार केल्यानंतर त्याच्या वापरासंबंधीचे प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात यावे.

६) शिक्षणात उपयोगी पडणाऱ्या साधनांच्याबद्दल साहित्यातील आधुनिक व नवीन तंत्र याबाबत शिक्षकांना अद्यावत माहिती पुरविणे.

७) सर्व शाळेतील शिक्षकांनी शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी कार्यशाळा आयोजित कराव्यात व प्रत्येक घटकानुसार शैक्षणिक साहित्य निर्मितीची माहिती शिक्षकांना द्यावी.

८) शिक्षक संघटनांनी विधायक कार्य म्हणून शैक्षणिक साहित्य निर्मितीचे केंद्र चालवावे. या केंद्रामार्फत कमी खर्चात शाळांना हे शिक्षण साहित्य पुरवता येईल.

९) शिक्षकांना साधनांविषयी माहिती देणे व आवड निर्माण करण्यासाठी साहित्य, प्रात्याक्षिक, संवाद, कथाकथन असे कार्यक्रम आयोजित करणे.

१०) शालेय परिसरातील लोकांकडून, आपल्या उपक्रमांची माहिती घेऊन आर्थिक निधी गोळा करुन त्यामध्ये शैक्षणिक साहित्य निर्मिती करावी.

११) निरनिराळ्या शाळांत शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन भरविणे, शिक्षकांना साहित्य वापरासंबंधीचे ज्ञान देणे व साहित्य प्रत्येक उपक्रमानुसार निर्मिती करण्यासंबंधी मार्गदर्शन करणे.

१२) उपक्रमांची माहिती देणे व त्या उपक्रमांनुसार साहित्य निर्मितीबद्दल माहिती देणारे मासिक अगर त्रैमासिक चालविणे. या मासिकांत शिक्षकांचे व तज्ञ लोकांचे लेख छापून कमीत कमी किंमतीत सर्व शाळांना पुरविणे.

**३.३.४ प्रभावी अध्यापनासाठी उपचारात्मक उपक्रम व समृद्धी उपक्रम :**

अध्यापन प्रभावी होणेसाठी त्या विषयाला व घटकाला अनुरुप असे उपक्रम आयोजित केले तर अध्यापन सतेज दिसून येते. शिक्षकाला ज्या पाठ्यवस्तूचे अध्यापन करावयाचे आहे तो मजकूर नेहमीच्या फळ्याच्या ठिकाणी चित्र दिसेल अशी योजना असते. शिक्षकांचे तोंड विद्यार्थ्यांकडे असते. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांकडे त्या उपक्रमांतून लक्ष केंद्रित करता येते.

अभ्यासक्रमात निर्धारित केलेल्या क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यासाठी शिक्षक अध्यापन करीत असतात. हे अध्यापन म्हणजे क्षमता विकासाच्या कामाची केवळ सुरुवात असते. सर्व क्षमतांवर विद्यार्थ्यांनी प्रभुत्व संपादन करावे यासाठी शिकविलेल्या भागाचे दृढीकरण होणे आवश्यक असते. मात्र हे दृढीकरण साचेबद्ध पद्धतीच्या सरावातून साध्य होत नाही. शिवाय साचेबद्ध पद्धतीमुळे अध्ययन आणि सराव या दोन्ही गोष्टी नीरस आणि कंटाळवाण्या होतात. त्यामुळे दृढीकरणाचा हेतू साध्य होत नाही. शिक्षकांच्या अध्यापनातून विद्यार्थ्याला प्राप्त झालेल्या ज्ञानाचा आणि कौशल्यांचा उपयोग करुन विद्यार्थ्यांना स्वत: शिकण्यासाठी विविध प्रकारे अर्थपूर्ण सराव करण्याच्या संधी उपलब्ध करुन देणे महत्वाचे आहे. अशा संधी विद्यार्थ्यांना सातत्याने उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांचे अध्ययन पक्के होते. विद्यार्थ्यांना अशा संधी उपलब्ध करुन देणाऱ्या उपक्रमांची आणि साहित्याची आवश्यकता आहे. असे उपक्रम आयोजित केल्याने क्षमतांचा विकास होतो.

15601

## ३.४ उपचारात्मक व समृद्धी उपक्रमांची रचना व कार्य :

विद्यार्थ्यांना विविध स्वरुपाच्या रंजककृती आणि खेळ यांच्या माध्यमातून स्वयं-अध्ययन करण्याची संधी दिली तर त्यांना अभ्यासक्रमातील निर्धारित क्षमतांवर प्रभुत्व मिळविणे शक्य होईल अशी अपेक्षा आहे. उपक्रमांची निवड करताना त्यांची व्यवहार्यता आणि उपयुक्तता तपासून पाहण्यात आलेली आहे. त्याचबरोबर आनंददायी शिक्षणाचे तत्व लक्षात घेऊन उपक्रमांमध्ये रंजकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच छोट्या गटांतील सामूहिक अथवा वैयक्तिक स्वरुपाच्या कृतीला प्राधान्य देण्यात आलेले आहे.

विद्यार्थ्यांना शिकण्याची प्रेरणा मिळेल अशा अध्ययन-प्रसंगांचा आणि कृतींचा समावेश उपक्रमांमधून करण्यात आलेला आहे. उपक्रमांच्या आयोजनामध्ये शिक्षकांची भूमिका मार्गदर्शकाची राहणार आहे. त्यामुळे 'विद्यार्थी-विद्यार्थी आंतरक्रिया' विद्यार्थी-साहित्य आंतरक्रिया यांना प्राधान्य मिळेल आणि विद्यार्थ्यांची अध्ययनामधील रुची आणि एकाग्रता वाढून त्यांची क्षमता - संपादणूक प्रभुत्व पातळीपर्यंत पोहोचण्यास मदत होईल.

घटकांची निवड करताना प्रत्येक क्षमतेचे स्वरुप आणि व्याप्ती, मुलांचे अनुभवविश्व आणि त्यांचा परिसर या बाबी प्रामुख्याने विचारात घेतल्या आहेत. मातृभाषा विषयाच्या संदर्भात एकेक क्षमता स्वतंत्रपणे विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे व्यवहार्य ठरत नाही. श्रवण समजपूर्वक झाल्यास आकलन व्यवस्थित होते, श्रवणावरच भाषण अवलंबून असते. लेखनावरही श्रवणाचा परिणाम होतो. शब्द संपत्तीचा विकास श्रवणावर अवलंबून आहे.

### ३.४.१ उपचारात्मक कार्यक्रमाचे स्वरुप :

विद्यार्थ्यांच्या क्षमता संपादनात आढळून आलेले अध्ययनातील अडथळे, उणीवा, त्रुटी व दोष दूर करुन विद्यार्थ्यांची संपादणुक प्रभुत्व पातळीपर्यंत पोचावी यासाठी केलेली योजनाबद्ध कार्यवाही म्हणजे उपचारात्मक कार्यक्रम होय.

अध्यापन प्रक्रिया, सराव / स्वाध्याय, चाचण्या आणि नवीन इयत्तेचा अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वीचा टप्पा अशा विविध टप्प्यांवर कमी जास्त प्रमाणात उपचारात्मक कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे आवश्यक ठरते. यासाठी शिक्षकांनी आपल्या अध्यापन पद्धतीबाबत क्षणभर प्रामाणिकपणे आत्मपरीक्षण करायला हवे. अध्यापनाशी संबंधित उपक्रमांची निवड केली पाहिजे.

दैनंदिन अध्यापनामध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी संपादणूक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक उपक्रमांची योजना करावी. तसेच वर्गातील प्रभुत्व पातळीकडे वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी क्षमता संपादन समृद्धीविषयक उपक्रमांचे आयोजन केल्याने त्यांच्या क्षमता वृध्दीसाठी अधिक उपयोग होतो. अध्ययन अध्यापन प्रक्रिया उपक्रमाधिष्ठित केल्यामुळे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना विविध कृतींमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते. त्यामुळे अध्ययन अनुभव प्रभावीरित्या होते. अध्ययन अर्थपूर्ण होऊन विद्यार्थ्यांची संपादणूक प्रभुत्वपातळीपर्यंत होण्यास मदत होते.

**उपक्रमाचे आयोजन**

१) वर्गपातळीवर - भाषिक खेळ, कथाकथन, पाठांतर, कविता इ. अभ्यासविषयक उपक्रम

२) शाळा पातळीवर - निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पधृ, तज्ज्ञांची व्याख्याने.

### ३.४.२ उपक्रमांचे नियोजन व त्यांची कार्यवाही :

पाठ्यपुस्तकाचे अध्यापन जसजसे पुढे जाईल तसतसे सर्व क्षेत्रांमधील क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यासाठी टप्प्याटप्प्याने उपक्रमांचे आयोजन करणे गरजेचे आहे. उपक्रमांचे आयोजन करण्यापूर्वी वर्गातील विद्यार्थीसंख्या, अध्ययनात पुढे व मागे असणारे विद्यार्थी त्यांच्यासाठी घ्यावयाचे उपक्रम यासाठी नियोजन करावे लागते.

विद्यार्थी संख्येनुरुप उपक्रम तयार करण्यात यावे. एका वेळेस अनेक उपक्रम राबविताना त्याठिकाणी हुशार विद्यार्थ्यांला गटनायक म्हणून त्याच्याकडून कार्य करुन घेणे गरजेचे आहे. उपक्रमांच्या आयोजनात शिक्षकांची भूमिका निरीक्षकाची असल्यामुळे त्यांच्याकडून सातत्यपूर्ण मूल्यमापन होत राहील आणि विद्यार्थ्यांच्या संपादणुकीतील उणिवा, त्रुटी, अडचणी वेळचेवेळी लक्षात येत राहतील. त्यामुळे

उपचारात्मक योजना करणे शिक्षकांना सोईचे होईल. उपचारात्मक उपक्रमांतून प्रत्यक्ष अध्ययन प्रक्रियेमध्ये मागे असणाऱ्या विद्यार्थ्याला अधिक गती घेता येते व जो अध्ययन प्रक्रियेत पुढे आहे त्यास समृद्धी उपक्रमांद्वारे अधिक ज्ञान प्राप्त होण्यास मदत होते.

### ३.४.३ उपचारात्मक व समृद्धी उपक्रमांचे फायदे :

उपचारात्मक व समृद्धी उपक्रम यांचा अध्यापनात उपयोग केल्याने पुढील प्रमाणे क्षमता विकासासाठी फायदे आहेत.

१) शिक्षक विद्यार्थ्यांच्या साहाय्याने उपक्रम वर्गात राबवू शकतात.

२) अध्यापनात उपक्रमांचा वापर केल्याने विद्यार्थी लक्ष केंद्रित करतात.

३) विद्यार्थ्यांची एकाग्रता केंद्रित होते.

४) विद्यार्थ्यांना पाठ्यविषयासंबंधी पारदर्शक चित्रे बनविण्यास सांगून त्यांना कार्यानुभव देता येते.

५) कमी वेळात आकलन होण्यास मदत होते.

६) अंगी असणाऱ्या क्षमतांचा विकास प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याने होतो.

७) घटकानुरुप उपक्रम राबवणूक करता येते.

८) काठीण्यपातळी सोपी करता येते.

९) विद्यार्थी स्वत: वेळ देऊन प्रत्यक्ष अध्ययनास प्रवृत्त होतो.

१०) स्वत:ची जाणीव निर्माण होते.

११) प्रत्यक्ष अनुभवाद्वारे अध्ययन होते.

१२) पाठ्य विषयाची उजळणी करुन घेण्यासाठी उपक्रमांचा फायदा होतो.

१३) विद्यार्थी स्वयंप्रेरणेने सहभागी होतात.

१४) विद्यार्थ्यांचा न्यूनगंड संपुष्टात येतो.

१५) विद्यार्थ्यांमध्ये अभिरुची निर्माण होते.

१६) कृतियुक्त उपक्रमांद्वारे आकृतीद्वारे आकर्षकता वाढविता येते.

१७) विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये अभिरुची निर्माण होते.

१८) शंकांचे निरसन केले जाते.

१९) प्रत्यक्ष विद्यार्थी उपक्रमात सहभागी होतो.

२०) क्षमता वाढीसाठी त्यास मदत होते.

२१) विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष कृतीला संधी प्राप्त होते.

### ३.४.४ मातृभाषा विषयाच्या उपक्रमांचा वापर :

भाषा हे विचार विनिमयाचे प्रमुख साधन आहे. परंतु बोलीभाषेचा पगडा विद्यार्थ्यांवर असल्याने अपेक्षित असलेल्या क्षमतांचा विकास साधला जात नाही. यासाठी क्षमतांचा विकास होणेसाठी अध्यापनात वापर करताना उपक्रमांची नियोजनबद्ध अशा स्वरुपाची मांडणी करावी लागते.

अध्यापन-अध्ययन प्रक्रिया घडत असताना अवघड संज्ञा सोपी करण्यासाठी त्या पाठ्यांशानुरुप व घटकानुरुप उपक्रमांचे आयोजन केल्याने त्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्याय अंगी असणाऱ्या सुप्त क्षमतांचा विकास होतो. याकरिता नियोजनबद्ध उपक्रमांची अंमलबजावणी करावी लागते. प्रक्रिया सुलभ होऊ शकते.

### ३.४.५ शैक्षणिक साधनांचा वापर करण्यासाठी नियोजन :

आधुनिक युगात नियोजनाला खूप महत्व आहे. शिक्षकाला अध्यापन साहित्य अथवा माध्यमे आपल्या अनुदेशात वापरावयाची झाली तर त्याने माध्यमांच्या उपयोगाचे नियोजन केले पाहिजे आणि आपणांस कोणती माध्यमे वापरावयाची हे निश्चित झाले की, नियोजन करावे. यात अध्यापनात वापर करण्यापुर्वी खालील नियोजन करावे.

१) पाठ्यविषयाला लागणाऱ्या साहित्याची निवड विचारपूर्वक करावी.

२) पाठ्यविषयाला लागणारे शैक्षणिक साहित्य उपलब्ध नसल्यास स्वत: तशा प्रकारचे शैक्षणिक साहित्य काढून ठेवावीत.

३) उपक्रमांची माहिती सांगण्यापूर्वी इष्ट असलेली माहिती त्या विद्यार्थ्यांना प्रास्ताविक म्हणून सांगून मग उपक्रमांची माहिती देण्यात यावी.

४) उपक्रमांची माहिती जाणून घेण्यासाठी विशिष्ट भागासाठी दर्शकाचा उपयोग करावा.

५) उपक्रमांचे स्पष्टीकरण करण्यात यावे.

६) कृतीयुक्त उपक्रमांची अंमलबजावणी करावी.

७) उपक्रमांची निवड करताना योग्य असे वातावरण असणे गरजेचे आहे.

८) अध्यापनाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून अध्यापन करण्यास प्रश्न काढावे.

९) प्रत्यक्ष उपक्रमांची अंमलबजावणी करण्यापूर्वी त्यांची चाचणी घेण्यात यावी.

१०) माध्यमे वापरुन झाल्यानंतर सारांश सांगावा अथवा प्रश्नोत्तराने काढून घ्यावा. गैरसमजुती दूर कराव्यात.

**३.४.६ उपचारात्मक व समृद्धी उपक्रमांच्या मर्यादा :**

१) सर्व उद्दिष्टांसाठी एकच उपक्रम उपयोगी पडू शकणार नाही.

२) नियोजनानुरुप उपक्रमांची अंमलबजावणी करताना वेळेची स्थिती बदलली जाईल.

३) शिक्षकाला मार्गदर्शक व निरीक्षक अशी भूमिका घ्यावी लागेल.

४) प्रत्येक विद्यार्थ्यांला या उपक्रमांमध्ये अभिरुची निर्माण होईल असे नाही.

५) वेळ जास्त द्यावा लागेल.

६) संपूर्ण अभ्यासक्रम उपक्रमांद्वारे शिकविणे शक्य होत नाही.

७) विद्यार्थ्यांचे सातत्याने मूल्यमापन केले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण होईल.

८) सर्वच शिक्षकांना उपक्रमांचे आयोजन करता येत नाही. सर्वच शिक्षकांना प्रशिक्षण देणे शक्य नाही.

९) सर्वच उपक्रम सगळीकडे राबविले जाणार नाहीत. त्या स्थानिक पातळीचा विचार करावा लागेल.

**३.४.७ शैक्षणिक उपक्रमांतील मर्यादेवरील उपक्रम :**

१) साध्य करावयाच्या उद्दिष्टानुरुप उपक्रमांचे आयोजन केल्यास अपेक्षित उद्दिष्टे साध्य होऊ शकतील.

२) उपक्रमांस लागणाऱ्या वेळेसाठी विद्यार्थ्यांचे गट पाडून त्याठिकाणी वेळेची बचत करता येईल.

३) शिक्षकांना मार्गदर्शक म्हणून भूमिका घेताना ती विद्यार्थ्यांसाठी उपक्रम तयार करुन गटनायक निवडल्यास बऱ्याच प्रमाणात सदरहू जबाबदारी कमी होईल.

४) आवड निर्माण होणेसाठी विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार स्वातंत्र्य देण्यात यावे.

५) वेळेचे उपक्रमांनुसार नियोजन करण्यात यावे.

६) अपेक्षित पाठ्यांशांची जागृती निर्माण करुन देणे.

७) विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार मूल्यमापन करण्यात येईल.

**३.४.८ सारांश :**

दैनंदिन अध्यापन करीत असताना विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त क्षमतांच्या विकासासाठी उपचारात्मक व समृद्धी उपक्रम यांची सांगड घातल्यास अध्ययन प्रक्रिया परिणामकारक होईल. विद्यार्थ्यांचे दीर्घकाळ अवधान घेवून ठेवण्यासाठी वरील प्रमाणे उपक्रमांचा वापर करावा लागेल. त्यामुळे शिक्षणाची अपेक्षित गुणवत्ता वाढेल व विकास होईल. शिक्षणाच्या विकासामुळे आपल्या देशाचा विकास होईल.

## क्षमता - श्रवण

### उपक्रम - १

**क्षमता विधान -** १.५.१ पाठांतर, नाट्य-संवाद आणि वादविवाद समजपूर्वक ऐकता येणे.

**उपक्रम** -| शालेय समारंभ, उत्सव, स्नेहसंमेलन, स्पर्धा इत्यादी माध्यमांतून भाषणे, पाठांतर नाट्य संवाद, मुलांना ऐकण्याची संधी प्राप्त करुन देणे.

**साहित्य** -| टेपरेकॉर्ड, संगणक, रेडिओ, गोष्टी, गाणी, चित्रे इ.

**कृती** -

१) कविता व गोष्टी ऐकवाव्यात. त्यावेळी आवश्यकतेनुसार साधनांचा वापर करण्यात यावा.

२) चांगल्या आवाजातील मुलांचा नाट्यसंवाद ऐकविणे.

३) कविता, भाषणे यांच्या ध्वनिफिती तयार करुन ऐकविणे.

४) कृतियुक्त सादरीकरण व मुक्त वातावरणात, सहजपणे होईल असे करावे.

## उपक्रम - २

**क्षमता विधान** - १.५.२ अपरिचित प्रसंगातील संवाद संभाषण आणि चर्चा समजपूर्वक ऐकता येणे.

**उपक्रम** - सहली भेट, व्यक्तींचे संभाषण, एकत्रित असताना ऐकलेले संवाद.

**साहित्य** - कोऱ्या ध्वनिफिती, टेपरेकॉर्डर, संभाषण व संवादाचे मुद्रण केलेल्या ध्वनिफिती, बाहुल्या.

**कृती** -

१) ध्वनिफितीवरील एकेक संवाद सर्व विद्यार्थ्यांना ऐकवावा.

२) पूर्वतयारी करुन घेतलेल्या निवडक विद्यार्थ्यांकडून संवादांचे सादरीकरण वर्गात करवून घ्यावे.

३) बाहुली नाट्याच्या माध्यमातूनही असे संवाद ऐकविता येतील.

४) परिचित विषयांवर गप्पा मारण्याचे नियोजन करुन शिक्षकांनी निवडक विद्यार्थ्यांशी गप्पा माराव्यात व उर्वरीत विद्यार्थ्यांना ऐकण्यात सहभागी करुन घ्यावे.

५) विद्यार्थ्यांनी संवाद, संभाषण समजपूर्वक ऐकले आहेत किंवा नाहीत हे अजमावण्यासाठी त्यावर आधारित सोपे प्रश्न विचारावेत.

६) विद्यार्थ्यांचे संवाद / संभाषण इथे कोऱ्या ध्वनिमुद्रिकेवर मुद्रण करावे. आपलाच आवाज परत ऐकण्याचा आनंद विद्यार्थ्यांना मिळेल.

...KAR LIBRARY
...IVAJI UNIVERSITY KOLHAPUR

## क्षमता - श्रवण - संभाषण

### उपक्रम - ३

**क्षमता विधान -** १.५.३ सामुहिक कृतीसंबंधी दिलेल्या सूचना समजपूर्वक ऐकता येणे.

**साहित्य** - टेपरेकॉर्ड, तोंडी सूचना सांगणे.

**कृती** -
१) वर्गातील सूचना नेहमीप्रमाणे देण्यात याव्यात.
२) सोयीनुसार विद्यार्थ्यांचे गट पाडावेत.
३) आवश्यक ती पूर्वतयारी झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात.
४) विद्यार्थ्यांना सूचनांचे आकलन झाले आहे किंवा नाही हे त्यांच्या प्रतिसादावरुन जाणून घ्यावे.

### उपक्रम - ४

**क्षमता विधान -** २.५.१ सहज आणि ओघवते बोलता येणे.

**साहित्य** - कार्डशीट पेपरवर वाक्यांचा संग्रह, संगणकावरील तयार केलेला लहानसा मजकूर, ध्वनिफित.

**कृती** -
१) एकेक वाक्य विद्यार्थ्यांना ऐकविणे तेच वाक्य दुसऱ्याकडून म्हणवून घ्यावे.
२) एकेक वाक्य एकेका विद्यार्थ्यांस ऐकवावे तेच वाक्य त्याच्याकडून म्हणवून घ्यावे.
३) ही कृती ध्वनिफितीच्या साहाय्यानेही घेता येईल.
४) विद्यार्थ्यांचे वाचन जसजसे प्रगत होत जाईन, तसतसे वाक्य पट्ट्यांचा वापर करून शिक्षकांनी गटनायकाकडून गटात कृती करवून घ्यावी. अशावेळी एका विद्यार्थ्यांने वाक्यपट्टीवरुन एक वाक्य वाचावे, दुसऱ्याचे तेच वाक्य म्हणून दाखवावे.

## क्षमता - भाषण

### उपक्रम - ५

**क्षमता विधान -** २.५.२ परिचित अशा साध्या विषयावर बोलता येणे.

**उपक्रम** -| गाणी, कविता, प्रसंग यांचा संग्रह.

**कृती** - १) पाठ्यपुस्तकातील कविता, गाणी, तसेच काही प्रसंग याविषयी विद्यार्थ्यांनी स्वत: कृतीयुक्त सहभाग घेतील.

२) सुरवातीला शिक्षकांनी गाण्याच्या, कवितेच्या ओळी स्वत: सांगाव्यात आणि विद्यार्थ्यांना मागे म्हणण्यास सांगावे. पाठांतर झाल्यानंतर समूहात / गटात गाणी / कविता म्हणवून घ्याव्यात.

३) विद्यार्थ्यांच्या परिचयातील गाणी, कविता सुद्धा त्यांच्याकडून म्हणवून घ्याव्यात.

४) वर्गातील विद्यार्थी ज्यावेळी बडबडगीते, गाणी अगर कविता म्हणू लागतात. त्यावेळी काही विद्यार्थी इतरांच्या सूरात सूर मिसळतात. हे टाळण्यासाठी विद्यार्थ्यांचे गटाकडून सादरीकरण घ्यावे.

५) कविता वर्गातील सर्व विद्यार्थ्यांकडून एकाच वेळी म्हणवून घ्यावीत. नंतर गटागटात म्हणूवन घ्यावीत व शेवटी प्रत्येकाला म्हणायला संधी द्यावी.

### उपक्रम -६

**क्षमता विधान -** प्रसंगांचे व घटनांचे वर्णन करता येणे.

**उपक्रम** -| दैनंदिन जीवनातील प्रसंग.

**कृती** - १) दररोजच्या जीवनातील नियमित चालणाऱ्या प्रसंगांचे वर्णन करणे.

२) पाहुण्यांचे आगमन झाल्यानंतर त्यांचे वर्णन करावे.

३) खेळाचे वर्णन करणे.

४) पाठ्यपुस्तकातील एखाद्या प्रसंगाचे वर्णन करणे.

## उपक्रम - ७

**क्षमता विधान -** २.५.४ बालनाट्य, वादविवादात भाग घेणे तसेच औपचारिक निवेदन करता येणे.

**साहित्य** - टेपरेकॉर्डर, संगणक, दूरदर्शन इत्यादी.

**कृती** - १) टेपरेकॉर्डरवरील संभाषण ऐकविणे.

२) गट तयार करून बालनाट्य आयोजित करणे.

३) दूरदर्शन वरील वादविवाद मालिका पाहणे.

४) संगणकावर चित्रीकरण करून प्रत्यक्ष पाहण्यास संधी उपलब्ध करून देणे.

## उपक्रम - ८

**क्षमता विधान -** ३.५.१ - सुलभ, आकृत्या, तक्ते आणि नकाशे समजपूर्वक वाचता येणे.

**साहित्य** - कल्प फलक, फळा, वाक्यप ट्ट्या, अक्षर पट्ट्या.

**कृती** - १) पाच-पाच विद्यार्थ्यांचा गट पाडून एकेक गट तयार करणे.

२) गटातील एका विद्यार्थ्यांकडून सर्व अक्षरांच्या जोड्या लावून घ्याव्या. जोड्या लावणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पुन्हा जोड्या जुळवून घ्याव्यात.

३) अक्षरपट्ट्या आणि विद्यार्थी बदलून सराव द्यावा.

| प्रश्न | | उत्तर | |
|---|---|---|---|
| मा | बा | मा | मा |
| बा | रा | बा | बा |
| का | स | का | का |
| या | चा | चा | चा |

## उपक्रम - ९

**क्षमता विधान -** ३.५.२ छापील व हस्तलिखित मजकूर समजपूर्वक वाचता येते.

**साहित्य** - पाठ्यपुस्तकातील कार्डसीटवर उतारे, कविता, दूरदर्शन, संगणकावर छापील साहित्य, हस्तलिखित इ.

**कृती** - १) पाठ्यपुस्तकातील निवडक उतारे निवडून त्याचे वाचन घेणे.

२) संगणकावर तयार केलेली माहिती वाचणे.

३) दूरदर्शनवरील बातम्या वाचणे.

४) हस्तलिखित वाचण्यास उपलब्ध करून देणे.

५) एकाच उच्चारांचे शब्द वाचनास देणे.

## उपक्रम - १०

**क्षमता विधान -** ३.५.३ - वर्तमानपत्रे व इतर छापील मजकूर समजपूर्वक वाचता येणे.

**साहित्य** - वर्तमान पत्र, गोष्टींची पुस्तके, दूरदर्शनवरील छापील मजकूर वाचणे.

**कृती** - १) शालेय परिपाठाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून दररोज वर्तमानपत्रातील बातम्यांचे वाचन घेणे.

२) बोध कथा विद्यार्थ्यांकडून वाचून घेणे.

३) लहान टाईपातील मजकूराचे वाचन घेणे.

४) पाठ्यपुस्तकातील एका पानाचे वाचन घेणे.

## उपक्रम - ११

**क्षमता विधान -** ४.५.१| योग्य अंतर ठेवून योग्य प्रकारे लिहिता येणे.

**साहित्य** - फलक, संगणक, ओव्हरहेड प्रोजेक्टर, तक्ते.

**कृती** - १) विद्यार्थ्यांकडून सुलेखन करुन घेणे.

२) शिक्षकांनी सुवाच्य अक्षरात लेखन करुन दाखविणे.

३) योग्य अंतर ठेवून योग्य पद्धतीने लिहिण्यासंबंधी मार्गदर्शन करणे.

४) विद्यार्थ्यांना योग्य गतीने लेखन करता यावे यासाठी श्रुतलेखनाचा सराव देणे.

५) शिक्षकांनी लेखनास मार्गदर्शन करणे.

## उपक्रम - १२

**क्षमता विधान -** ४.५.२ - विरामचिन्हांचा योग्य उपयोग करुन मजकूराचे श्रुतलेखन करता येणे.

**साहित्य** - फलक, कार्ड, तक्ते, टेपरेकॉर्ड, दूरदर्शन.

**कृती** - १) शिक्षकांनी टेपरेकॉर्ड वरील संवाद ऐकवून विद्यार्थ्यांना लेखनास प्रवृत्त करणे.

२) दूरदर्शनवरील कार्यक्रम ऐकून त्यांचे लेखन करणे.

३) कार्डवरील पाहून लेखन करणे.

## उपक्रम - १३

**क्षमता विधान -** ४.५.३| साधी, सोपी पत्रे, संवाद आणि छोटे निबंध स्वतंत्रपणे लिहिता येणे.

**साहित्य** -| चित्रे उपलब्ध करून दणे, कार्डशीट, फोटो, संगणक, ओव्हरहेड प्रोजेक्टर इ. चित्रसंच.

**कृती -** १) पाच-पाच विद्यार्थ्यांचे गट करावेत. गटनायक नेमावा.

२)| प्रत्येक विद्यार्थ्याला चित्रसंच असलेले एक कार्ड द्यावे.

३) मिळालेल्या कार्डावरील चित्रे पाहून प्रत्येक विद्यार्थ्यांला त्या चित्रावरून माहिती लिहितात.

४)| प्रत्येक चित्राबद्दलची माहिती तपासणे.

## उपक्रम - १४

आपणच स्वत: लिहूया.

**साहित्य** -| विद्यार्थ्यांना स्वत:हून लिहिता येईल अशा विषयांची सूची.

**कृती -** १) पाच-पाच विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटाला एक गटनायक नेमावा.

२)| प्रत्येक गटाला एकेक विषय द्यावा.

३)| गटातील विद्यार्थ्यांनी त्यांना दिलेल्या विषयानुसार शब्दांचे लेखन करावे.

४)| गटनायकाने तपासावे.

उदा. १. गटनायक सांगेतल सर्वांनी 'गावांची नावे लिहा'.

विद्यार्थी लिहितील -

१) २) ३) ४)| ५)|

## उपक्रम - १५

आपणच स्वत:च लिहूया.

साहित्य - विद्यार्थ्यांच्या आवडीचे विषय, शैक्षणिक साधने, उपलब्ध करुन देणे.

कृती - १) विद्यार्थ्यांचे गट पाडून त्यांच्या अभिव्यक्तीनुसार लेखन करण्यास प्रवृत्त करणे.

२) विषयांची निवड प्रत्येक गटाच्या आवडीनुसार करावी.

३) शिक्षकांची भूमिका मार्गदर्शकाची राहील.

४) लेखनासाठी प्रत्यक्ष अनुभव घेऊन लेखन करण्यास वेळ उपलब्ध करून देण्यात येईल.

५) विद्यार्थ्यांच्या आवडीच्या विषयाची निवड केली जाईल.

६) लेखनासाठी आवश्यक असणारी साधने उपलब्ध करुन दिली जातील.

७) विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त क्षमतांचा विकास होण्यास प्रोत्साहन मिळेल.